महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

क्र. पी-आर-३/सबसिडी/ 28577 दिनांक : 15 JUL 2008

## वाणिज्य परिपत्रक क्र. 84.

विषय : सन २००८ या वर्षातील खरीप हंगामात राज्यात दि. १जून २००८ ते आतापर्यंतच्या कालावधीत पडणा-या सरासरी पावसाच्या तुलनेत कमी पाऊस झालेल्या ठिकाणच्या शेतक-यांचा वीज पुरवठा थकीत बिलाच्या कारणास्तव खंडित न करणेबाबत.

संदर्भ : शासन निर्णय क्र. एस.सी.वाय.-०७०८/प्र.क्र.१३३/म-७ दि. ०९.०७.२००८.

वरील संदर्भाधिन पत्राव्दारे कळविण्यात येते की, राज्यात सन २००८ मध्ये मोसमी पर्जन्यमानास जून महिन्याच्या पहिल्या आठवडयापासून सुरुवात झाली. परंतु सुरुवातीच्या पावसानंतर राज्यातील विविध भागातील पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा अत्यल्प असल्याने राज्याच्या बहुतांश भागात टंचाई सदृश्य परिस्थिती उद्भवल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. या परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाने सुचविलेल्या उपाययोजनेअंतर्गत वरील संदर्भातील शासन निर्णयान्वये राज्यातील खरीप हंगामात बाधित शेतक-यांची वीज कनेक्शन, थकीत बिलामुळे तोडली जाऊ नयेत असे आदेश दिलेले आहेत.

या अनुषंगाने वरील उपाय योजना दि. ३१.०८.२००८ अथवा पावसाचे प्रमाण समाधानकारकरित्या होईपर्यंत कार्यान्वीत ठेवाव्यात असेही सदर निर्णयात निर्देशित करण्यात आलेले आहे. या अनुषंगाने सर्व संबंधित क्षेत्रिय अधिका-यांना सुचना देण्यात येत आहेत की, शासनाच्या सदर धोरणानुसार राज्यातील खरीप हंगामात बाधित शेतक-यांचा वीज पुरवठा थकीत बिलाच्या कारणास्तव शासनाच्या पुढील आदेशापर्यंत खंडित करु नयेत.

सहपत्र : शासन निर्णय क्र.एससीवाय०७०८/प्र.क्र.१३३/म-७
दि. ०९.०७.२००८.

15/07/08
मुख्य अभियंता (वाणिज्य)

प्रत सस्नेह सादर :-
मुख्य अभियंता, सर्व परिमंडळे, म.रा.वि.वि.कं. मर्यादित.

प्रत रवाना :-
अधिक्षक अभियंता, सर्व संवसु मंडळ कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित.
कार्यकारी अभियंता, सर्व संवसु विभागीय कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित.
उपकार्यकारी अभियंते/सहाय्यक अभियंते, सर्व संवसु उपविभाग कार्यालये, म.रा.वि.वि.कं. मर्यादित.

C:\Documents and Settings\Patil Madam\Suchita\AE (Bara)\Subsidy\Subsidy draught Kharip २००८.doc

**राज्यात दिनांक १ जून, २००८ ते आतापर्यंतच्या कालावधीत पडणा-या सरासरी पावसाच्या तुलनेत कमी पाऊस झालेल्या ठिकाणी आवश्यक उपाययोजना करणे.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक-एससीवाय०७०८/प्र.क्र.१३३/म-७**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : ९ जुलै, २००८**

वाचा :- १) शा. नि. पा.पु. व स्व. वि क्रमांक टंचाई १००८/प्र.क्र.८९/पापु-१४, दिनांक २१.६.२००८
२)शा. नि. म व व वि क्र.-एससीवाय०६०८/प्र.क्र.१३३/म-७, दिनांक २३.६.२००८

**शासन निर्णय :**

राज्यात सन २००८ मध्ये मोसमी पर्जन्यमानास जून महिन्याच्या पहिल्या आठवडयापासून सुरुवात झाली. परंतू सुरुवातीच्या पावसानंतर राज्यातील विविध भागात पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा अत्यल्प असल्याने राज्याच्या बहुतांश भागात टंचाई सदृश्य परिस्थिती उदभवल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. या टंचाई सदृश्य परिस्थितीमुळे पाणी टंचाई व चारा टंचाई इत्यादी समस्या निर्माण झाल्या आहेत, तसेच विविध भागात पेरण्याही होऊ शकलेल्या नाहीत. या परिस्थितीवर मात करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात येत आहेत :-

१) रोजगार हमी योजनेअंतर्गत आवश्यकतेप्रमाणे कामे सुरु करावीत व कोणीही रोजगारापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. रोजगार मागणा-यांची संभाव्य संख्या लक्षात घेऊन पुरेशी कामे शेल्फवर उपलब्ध असतील याची दक्षता जिल्हाधिका-यांनी घेणे आवश्यक आहे.
२) जेथे पिण्याची पाण्याची टंचाई असेल तेथे ती दुर करण्यासाठी टँकर, बैलगाडयांमार्फत पाणी पूरवठा करणे, तात्पूरत्या नळ योजना कार्यान्वित करणे इत्यादी तत्सम सर्व उपाययोजना करण्यात याव्यात.
३) या भागातील मोठया, मध्यम व लघू प्रकल्पामध्ये साठणारे पाणी पिण्यासाठी अग्रहक्काने राखून ठेवण्यात यावे.
४) आवश्यक तेथे चारा डेपो उघडण्यात यावेत.
५) आवश्यक तेथे जनावरांच्या छावण्या उघडण्यात याव्यात.
६) खरीप हंगामात बाधित शेतक-यांकडून कोठेही जमीन महसूलाची सक्तीने वसूली करण्यात येऊ नये.
७) खरीप हंगामात बाधित शेतक-यांची वीज कनेक्शन थकित बीलामुळे तोडली जाऊ नयेत.

वरील उपाययोजना दि. ३१.०८.२००८अथवा पावसाचे प्रमाण समाधानकारकरित्या होईपर्यंत कार्यान्वित ठेवाव्यात. विविध विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय अधिका-यांना या अनुषंगाने स्वतंत्ररित्या आदेश त्वरीत निर्गमीत करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( जि. शां. वाणी )
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग